**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.**
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
२८ क्वीन्स् गार्डन, जुन्या सर्किट हाऊसजवळ, पुणे-४११ ००१. दूरध्वनी क्र. : ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३०
● E-mail : directorbarti@gmail.com ● Website : https://barti.maharashtra.gov.in ● फॅक्स :०२०-२६३३ ३५९६

# पटकथा (Screenplay) लिहिण्यासाठी स्पर्धा – पुरस्कार

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्ताने शासनामार्फत चालू वर्ष हे **"सामाजिक न्याय व समता वर्ष"** म्हणून साजरे करण्यांत येत आहे . त्याअंतर्गत खालील विषयांवर विविध टी. व्ही. चॅनेल्स, इत्यादीद्वारे लोकांच्या आणि विशेष करुन शालेय व विद्यालयीन विद्यार्थी यांच्या प्रबोधनासाठी विविध लघुचित्रपट (Short Films/ Documentary Films) /एनिमेशन फिल्म्स (Animation Films) "बार्टी", पुणे या संस्थेकडून तयार करण्यांत येणार आहेत. त्यासाठी खालीलपैकी प्रत्येक विषयांवर १० ते १३ मिनिटाची (Screenplay) लिहिण्यासाठी स्पर्धा आयोजित करण्यांत येत आहे.

| विषय |
|---|
| ➢ **न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता; आपल्या संविधानाची अतुलनीय महता.** |
| ➢ **बंधुत्व व एकात्मता; बंधुपेक्षा बंधुत्व मोठे.** |
| ➢ **न्याय व स्वातंत्र्य –प्रत्येक व्यक्तिचा मुलभूत हक्क.** |
| ➢ **मुलगी वाचवा – भविष्य घडवा.** |
| ➢ **व्यसन – मृगजळाकडून विनाशाकडे.** |
| ➢ **भ्रष्टाचारमुक्त भारत - नैतिक भारत.** |
| ➢ **जादुटोणा व बुवाबाजी – ही तर केवळ फसवणूक व ठगबाजी.** |
| ➢ **वैज्ञानिक दृष्टीकोन व अंधश्रध्दा निर्मूलन.** |
| ➢ **स्त्री-पुरुष समानता – देशाची महानता.** |
| ➢ **स्वच्छ भारत – समृध्द भारत.** |
| ➢ **ख्रिश्चन, बौध्द, हिन्दू, मुसलमान, जैन असो वा शीख – भारताचे संविधान सर्वांचा सहारा.** |
| ➢ **आपणा सर्वांचे कर्तव्य; - अपंग व्यक्तींची काळजी व त्यांचा सन्मान.** |
| ➢ **अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मूलभूत हक्क.** |
| ➢ **जाणीव संविधानातील मूलभूत हक्कांची; जाणीव संविधानातील मूलभूत कर्तव्यांची.** |
| ➢ **स्त्रियांच्या प्रतिष्ठेला बाधा आणणा-या प्रथांचा त्याग.** |
| ➢ **जेथे राहील समता; तेथे राहील प्रसन्नता.** |

- आंतरजातीय विवाह - एकजूट समाजाचा पाया.
- ज्येष्ठ नागरिकांची काळजी व त्यांचा सन्मान - आपल्या सर्वांचे कर्तव्य.
- राष्ट्रीय एकता आणि एकात्मता.
- जातपंचायती प्रथेचे निर्मूलन; मागासपणाचे उन्मूलन.
- सांप्रदायिक सहिष्णुता व सद्भावना.
- महिला सुरक्षित तर समाज सुरक्षित; समाज सुरक्षित तर देश सुरक्षित.
- महिला सक्षम तर समाज सक्षम; समाज सक्षम तर देश सक्षम.
- सत्कार्यासाठी सर्व काळ व दिशा शुभ.
- कायद्यापुढे सर्व समान; संविधानाची तरतूद महान.
- अल्पसंख्याक वर्गाच्या हितसंबंधाचे संरक्षण; शांत, सुखी व समृध्द भारताचे सुलक्षण.
- धर्म, वंश, जात, लिंग, कुल, निवास किंवा जन्मस्थान —<br>केवळ या कारणावरुन करता कामा नये भेदभाव.<br>(आमच्या संविधानातील अशा मूलभूत तरतूदीचा अभिमान).
- धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे मी आहे;<br>त्यान्वये सामंजस्य व बंधुभाव वाढीला आणि देशाच्या प्रगतीला पोषक मी आहे.
- आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृध्द वारसा.
- शिक्षणाने व कष्टाने मिळणार सन्मान — हे आमचे अधिष्ठान.
- मूलभूत हक्कांची अंमलबजावणी करण्याकरिता आदेश देण्याचे अधिकार मा . सर्वोच्च न्यायालयास संविधानाने दिले आहेत.
- विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य;<br>भारताच्या संविधानाने दिले खरे मानवी स्वातंत्र्य.
- स्वातंत्र्य, समता, बंधुता वसे जिथे, लोकशाही राहते शाश्वत तिथे.
- डॉ. आंबेडकर — महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रातील थोर सुधारक.
- महिला मजूरांची सामाजिक सुरक्षा.
- बांधकाम करणा-या मजूरांची सामाजिक सुरक्षा.
- सफाई कामगारांची सामाजिक सुरक्षा.
- सामाजिक सलोखा.
- जातीय दुर्भावनांचे निर्मूलन.
- सर्व संप्रदायांनी मिळून मिसळून, खेळीमेळीने राहणे उत्तम.

**टीप: उपरोक्त विषयामध्ये आणखी कांही विषयाचा समावेश झाल्यास याच लिंकवर उपलब्ध करुन देण्यात येईल.**

तरी उपरोक्त पैकी **कोणत्याही विषयावर** १० ते १३ मिनिट कालावधीच्या व्हीडिओ लघुचित्रपटासाठी (Short Films/ Documentary Films) / एनिमेशन फिल्म (Animation Films) तयार करण्यासाठी **प्रत्येक विषयनिहाय स्वतंत्र** पटकथा (Screenplay) मागविण्यांत येत आहेत.

**कोणत्याही विषयावर सर्वोत्कृष्ट म्हणून निवडलेल्या पटकथा (Screenplay) ला रु. १५,०००/- (रुपये पंधरा हजार फक्त) पारितोषिक म्हणून दिले जाणार आहे.**

## पटकथा (Screenplay) लिहिण्यासाठी स्पर्धा

### अटी व शर्ती

१) कोणत्याही व्यक्तीला एका पेक्षा जास्त विषयावरील पटकथा लेखनामध्ये सहभागी होता येईल. मात्र कोणताही विषय निवडल्यास त्या विषयावर १० ते १३ मिनिटाची व्हीडीओ लघुचित्रपट (Short Video Films/ Documentary Films) / एनिमेशन फिल्म (Animation Films) तयार होतील अशा प्रकारची पटकथा (Screenplay) सादर करावी लागणार.

२) पटकथा (Screenplay) मराठी, इंग्रजी, किंवा हिंदी या तिनही भाषां पैकी कोणत्याही एका भाषेमध्ये सादर करता येईल.

३) पटकथा सुवाच्छ हस्ताक्षरात किंवा कॅम्प्यूटरवर टाईप केलेले असावे.

४) कोणताही विषय निवडून त्यावर पटकथा "बार्टी", पुणे यांचे कार्यालयात खालील पत्यावर पाठविणे आवश्यक राहील. (लिफाफावर "पटकथा" लिहावे).

डॉ. वसंत रामटेके, प्रकल्प संचालक (विशेष प्रकल्प), डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), २८ क्विन्स गार्डन, जुन्या सर्कीट हाऊसजवळ, पुणे-४११ ००१

**ज्या उमेदवारांना ई -मेलद्वारे पटकथा पाठवावयाची आहे त्या उमेदवारांनी barti.screenplay@gmail.com या ई -मेल आयडीवर स्कॅन करुन दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठवू शकतात.**

**५) बार्टी, पुणे यांचे कार्यालयात पटकथा पोहचण्याचा अंतिम दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ राहील.**

६) पटकथा पाठवीतांना उमेदवारांनी आपले नांव , मोबाईल क्रमांक , ई-मेल आयडी व स्वत :चा व्यवसाय इत्यादि माहिती न चुकता स्वतंत्र कागदावर / पृष्ठांवर नमुद करावे.

७) उपरोक्त नमुद केलेल्या विषयांपैकी प्रत्येक विषयावर आधारीत लघु चित्रपटाचे (Short Video Films/ Documentary Video Films) / एनिमेशन फिल्म (Animation Films) च्या माध्यमातून लोकांना व विशेष करुन शालेय आणि विद्यालयीन विद्यार्थी यांना समाजहिताचे आणि देशहिताचे दृष्टीने चांगला संदेश मिळून समाजाचे व विशेष करुन शालेय व विद्यालयीन विद्यार्थी यांचे प्रबोधन व्हावे हा दृष्टीकोन समोर ठेवून पटकथा लिहीणे आवश्यक आहे . सबब, उपरोक्त गंभीर विषयांवर जन सामान्यांना प्रबोधनात्मक चांगला संदेश देऊ न शकणा -या व फक्त मनोरंजक स्वरुपाच्या पटकथा स्पर्धेमध्ये स्विकारण्यात येणार नाहीत.

८) कोणतीही पटकथा निवडण्यात आली नाही तर जाहीर पारितोषिक राखून ठेवण्यांत येईल.

९) सदर स्पर्धा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकारी किंवा कोणत्याही व्यक्तीची निवड करण्याचे किंवा निवड न करण्याचे अधिकार महासंचालक, बार्टी यांनी राखून ठेवलेले आहेत.

१०) उपरोक्त लघुपटकथा लिहीण्यासाठी आयोजित स्पर्धेअन्वये कोणत्याही लेखकांनी बार्टीकडे सादर केलेल्या पटकथावर कोणत्याही लेखकाचे कॉपी राईट (Copy right) राहणार नाही.

११) उपरोक्त विषयाबाबत कांही शंका / प्रश्न असल्यास खाली ल संपर्क अधिकारी यांचेशी संपर्क साधावे. श्रीमती पद्मश्री पाटील , मोबाईल नं . 94049 99457 ई-मेल ॲड्रेस bartidrpatil@gmail.com (वेळ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत).